# भिंवडी निजामपुर शहर महानगरपालिका, भिंवडी
## बांधकाम विभाग

**प्रस्तावना :-**

**विषय :- भिंवडी निजामपूर शहर मनपा क्षेत्रातील मंडई येथील बी.जी.पी हॉस्पीटल ईमारती भोवती संरक्षण भिंत, गेट,पाण्याची टाकी व इतर कामे करणेबाबत...**

उपरोक्त विषयांकीत कामी अंदाजपत्रकीय रक्कम १,३२,३४,७४८/- करिता फेर निविदा सुचना १०४/२०२३-२४ दि. २५/१०/२०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. निविदेचे टेक्नीकल बीड (पहीले पाकीट) दि २०/११/२०२३ रोजी उघडण्यात आले असता एकुण ०५ निविदा प्राप्त झाल्या आहेत. निविदेच्या छाननी अंती दस्ताऐवज पुर्ण असल्यामुळे ०५ हि निविदा पात्र ठरविण्यात आल्या आहेत. फायनानसिल बीड (दुसरे पाकीट ) दि २९/११/२०२३ रोजी उघडण्यात आले असुन त्याचा तौलोनिक दर तक्ता खालील प्रमाणेआहे.

| अ.क | ठेकेदाराचे नाव | निविदा दर (टक्केवारी) | निविदेतील दराची रक्कम |
|---|---|---|---|
| १ | मे. झा.पी.अॅण्ड कंपनी | अंदाजपत्रकीयदरापेक्षा १४.९९ टक्के पेक्षा कमी | १,१२,५०,७५५.७९ |
| 2 | हिदुस्थान इंटरप्रायझेस | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १४.८० टक्के पेक्षा कमी | १,१२,७५,९०१,५८ |
| ३ | अॅकार्ड असोसिएटस | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १४.९९ टक्के पेक्षा कमी | १,१२,५०,७५५,७९ |
| ४ | ए.आय.इन्फास्ट्रक्चर | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०.२० टक्के पेक्षा कमी | १,१८,८४,६९४.३९ |
| ५ | हिमालय मनोहर पाटील | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १३.२१ टक्के पेक्षा कमी | १,१४,८६,३३२.१४ |

वरील प्राप्त व पात्र ०५ फेर निविदेतील दोन निविदाकार १) झा.पी. अॅण्ड कंपनी (अंदाजपत्रकीय दरापेक्षा १४.९९ टक्के पेक्षा कमी ) व २) अॅकार्ड असोसिएटस (अंदाजपत्रकीय दरापेक्षा १४.९९ टक्के पेक्षा कमी) यांचे निविदा दर समान असल्याने सदर कामाच्या अनुषंगाने कामात स्पर्धात्मक निविदेच्या दरात बरोबरी झाली असल्यामुळे मे. झा.पी.अॅण्ड कंपनी व अॅकार्ड असोसिएटस यांना पत्र देवून स्पर्धात्मक निविदेच्या वाटाघाटी करिता सिलबंद लिफाफ्यासह मा.उपायुक्त तथा निविदा समिती अध्यक्ष यांच्या दालनात दि. ४/१२/२०२३ रोजी झालेल्या बैठकी मध्ये फेर निविदे बाबतचा अंतिम निर्णय मे. झा.पी.अॅण्ड कंपनी यांच्या बाजुने म्हणजेच झालेल्या वाटाघाटी मध्ये १८% (टक्के) कमी दराने काम करण्यास होकार दर्शविलेला आहे. मे. झा.पी. अॅण्ड कंपनी यांची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८% (टक्के) कमी दराची म्हणजेच रक्कम रुपये १,०८,५२,३९३ /-ची असल्याने त्यास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्यलेखा व वित्त अधिकारी व अति. आयुक्त यांनी केलेल्या शिफारसी प्रमाणे मा. आयुक्त महोदय यांनी मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये संविदा करणे कामी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

**प्रशासकीय ठराव क्रं.** 304 **दिनांक** 15 **/१२/२०२३**

मे.झा.पी. अॅण्ड कंपनी यांची निविदा सर्वात कमी दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८% (टक्के) कमी दराची रक्कम रुपये १,०८,५२,३९३ /- ( एक कोटी आठ लाख बावन हजार तीनशे त्र्यानव ) च्या खर्चाची निविदा मंजुरीस शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्यलेखा व वित्त अधिकारी व अति. आयुक्त यांनी केलेल्या शिफारसी प्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग.मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ २०२०/प्र.क्र७१ (भाग-२) नवि १४ दिनांक ०६जुन २०२२ अनव्ये महाराष्ट्र

महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत कलम ४५२ अ (१अ) मधिल तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिंवडी निजामपुर शहर महानगरपालिका, भिंवडी निजामपूर शहर मनपा क्षेत्रातील मंडई येथील बी.जी.पी हॉस्पीटल ईमारती भोवती संरक्षण भिंत, गेट,पाण्याची टाकी व इतर कामे करणेकामी सर्वात कमी दराचे निविदाकार मे.झा.पी. ॲण्ड कंपनी यांचे समवेत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३(क) अन्वये संविदा करण्यास मंजुरी देत आहे.

**(अजय वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिंवडी निजामपुर शहर महानगरपालिका**